# विभाग दुसरा:

# राजकीय भूगोल मधील संकल्पना

---

2.1 राज्य (State)
2.2 राष्ट्र (Nation)
2.3 सीमारेषा (Boundary)
2.4 सीमाप्रदेश (Frontier)

---

## 2.1 राज्य (State)

राज्यसंस्था ही राजकीय भूगोलाच्या अभ्यासाचा केंद्रबिंद आहे. म्हणजेच राज्य ही संकल्पना राजकीय भूगोलाच्या अभ्यासातील एक महत्वपुर्ण घटक आहे. त्यामुळे राज्य किंवा राज्यसंस्था म्हणजे काय ? या दोन्ही सकल्पनामध्ये फरक कोणता? हे समजून घेणे आवश्यक 'आहे. 'राज्य' यासाठी इंग्रजीत (State) हा शब्द असून 'Status' या शब्दापासुन हा शब्द आला आहे. राज्य ही एक अव्यक्त किंवा अमुर्त संज्ञा असुन भुप्रदेश, समाज व शासन / सरकार यांचा एकत्रित उल्लेख 'राज्य' या संज्ञेत केला जातो. वास्तविक समाज व सरकार ह्या मुर्त किंवा व्यक्त घटकांना राज्य समजण्याची चुक नेहमी केली जाते. शासनयुक्त समाज म्हणजे राज्य असा इटलीत सर्वप्रथम शब्दप्रयोग केला गेला. भारतात राजाच्या अधिकाराखालील भुप्रदेश म्हणजेच राज्य असे मानले जात असे. आधुनिक शास्त्रीय परिभाषेत राज्य या संज्ञेला विशिष्ट अर्थ आहे. म्हणून अनेक भूगोलवेत्यांनी राज्य ह्या संज्ञेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भूगोलवेत्यांनी राज्य म्हणजे एक भौगोलिक घटक (State as a Geographic Unit) असल्याचे मान्य केले आहे.

**व्याख्या :**

1. "राज्य म्हणजे असे क्षेत्र की, ज्या भूक्षेत्राच्या सीमेअंतर्गत त्याची सर्वोच्च सत्ता असते व त्या क्षेत्रातील समाज आणि संसाधनांवर प्रशासन असते "- प्रा. एल कार्लसन

2. "विशिष्ट भूप्रदेशावर कमी अधिक प्रमाणात कायम वस्ती करून राहणारा, सार्वभौम व एका सुसंघाटित शासनसंस्थेची आज्ञा स्वाभाविकपणे पाळणारा मानवी समाज म्हणजे राज्य होय. "- प्रा. गार्नर

3. "एका निश्चित भूप्रदेशात राजकीयदृष्ट्या संघटीत झालेले लोक म्हणजे राज्य होय.- ब्लंटशी

4. विशिष्ठ भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटीत झालेला मानवी समाज म्हणजे राज्य होय. "- संयुक्त राष्ट्र ऑफ अमेरीकेचे माजी राष्ट्राध्यक्ष विल्सन

5. "राज्यसंस्थेचे भूप्रदेश व मानवी समाज हे घटक असून ते राजकीय पातळीवर संघटित झालेले असतात- ए. ई. मुडी

6. "विशिष्ट व मानवी समाज एका एककात संघटित भूप्रदेश झालेले असतात त्यास राज्यसंस्था असे " म्हणतात. फ्रेडरिक रॅटझेल

थोडक्यात, राज्य म्हणजे केवळ भौगोलिक क्षेत्र नसुन क्षेत्र, मानव व राजकीय संघटन ह्या तीन घटकांचे मिळून राज्य बनते. हे तीन घटक वेगवेगळे नसुन त्या प्रत्येक घटकाचे अस्तित्व एक दुसऱ्यावर अवलंबुन असते. ह्या घटकांच्या एकत्रिकरणातुनच राज्याचा विकास होत असतो राज्य हे वैधानिक व सार्वभौम संघटना असून त्यास दंड करण्याचा अधिकार असतो. राज्य ही कायम स्वरूपाची प्रादेशिक संघटना आहे.

**राज्याचे मुलभूत घटक (Fundamental Elements of The State)**

साधारणपणे राज्याचे चार प्रमुख घटक मानले जातात ते घटक पुढीलप्रमाणे

१.भूक्षेत्र/भूप्रदेश
२.लोकसंख्या
३.शासनसंस्था
४. सार्वभौमत्व
१) भूक्षेत्र / भूप्रदेश :

भूप्रदेश किंवा भूक्षेत्र हा राज्याचा महत्वाचा घटक आहे. निश्चित भूप्रदेशाशिवाय राज्य असूच शकत नाही केवळ भूप्रदेश असुन चालत नाही तर विशिष्ट भूप्रदेश असावा लागतो कारण जोपर्यंत लोक एका विशिष्ट भूप्रदेशात रहिवास करत नाहीत तोपर्यंत त्यास राज्याचे स्वरूप प्राप्त होत नाही. भूप्रदेशाचा आकार, विस्तार, किती असावा हे निर्धारीत नसले तरी भूप्रदेशाच्या प्राकृतिक वैशिष्ट्यांवर त्या त्या राज्यांची शक्ती, विकास व विस्तार अवलंबुन असतो भूप्रदेशाचे स्थान, विस्तार, आकार, हवामान, भूरचना, मृदा, वनस्पती, जलाशय, खनिजसपत्ती इत्यादी भूप्रदेशाची वैशिष्ट्ये राज्याच्या विकासास कारणीभुत ठरतात.

ग्रीक विचारवत प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या मते, आकाराने लहान असलेल्या भूप्रदेशावर नियंत्रण ठेवणे सोपे जाते, कारण लहान आकाराच्या प्रदेशातील लोकांमध्ये एकात्मतेची भावना सहजपणे निर्माण होते इंग्लड, जर्मनी, जपान या देशांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आढळते. त्याच्या मागील कारणामध्ये त्या देशांचा लहान आकार हे एक कारण समजले जाते.

परंतु काही विचारवंताच्या मते, भूप्रदेशाचा आकार मोठा असावा, कारण मोठ्या आकाराच्या भुप्रदेशात नैसर्गिक साधन संपत्ती जास्त असण्याची शक्यता अधिक असते. मात्र इग्लंडसारखा देश लहान असुनही तेथे विविध प्रकारची नैसर्गिक संपत्ती सापडते. कारण, भूप्रदेशाच्या आकारापेक्षा भूप्रदेशाची प्राकृतिक वैशिष्ट्ये व गुणधर्म अधिक महत्वाची असतात.

२. लोकसंख्या (Population):-

लोकसंख्या हा प्रत्येक राज्याचा आत्मा असतो. लोकसंख्येचा आकार, वितरण, प्रकार याचा राज्याशी संबंधित विविध प्रकारे परिणाम होतो. लोकसंख्या व राज्यातील उपलब्ध साधन संपत्ती यांच्यात संतुलन असेल तर राज्य प्रगती करू शकते. परंतु राज्यातील उपलब्ध साधनसंपत्ती तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात अपुरी असेल तर मात्र प्रगती मध्ये अनेक अडचणी निर्माण होतात. यामुळे बऱ्याचदा राज्यांतर्गत कलह, बंडखोरी, वादविवाद निर्माण होऊन अराजकता माजते. खरे तर लोकसंख्या हि कोणत्याही राज्याची शक्ती असते, लोकसंख्येवर तेथील उत्पादन क्षमता ठरते. परंतु लोकसंख्या यासाठी सक्षम असावी लागते. तसेच राज्यातील लोकसंख्येच्या प्रजातीय स्वरूपावर राज्याची एकता अवलंबुन असते. राज्यात विविध प्रजातीय लोक राहत असल्यास त्यांच्यात वांशिक, जातिय, धार्मिक भेदातुन कलह निर्माण होतात. त्याचा परिणाम राज्याच्या स्थैर्यावर होतो. राज्यातील लोकांची सुरक्षा व त्याचा अधिकाअधिक विकास हेच राज्याचे उद्दीष्ट असते.

3. शासनसंस्था (Government) :

राज्यातील लोकसमुदायाला विशिष्ट नियमांच्या माध्यमातुन संघटित करून सामुदायिक जीवन जगण्याची शक्यता निर्माण करण्यासाठी शासनसंस्थेची गरज असते. शासनसंस्थेशिवाय राज्य अस्तित्वात राहू शकणार नाही. राज्याच्या स्थैर्यासाठी व अस्तित्वासाठी प्रभावी शासनसंस्था असणे आवश्यक असते. कारण राज्यसंस्था प्रभावी नसेल तर लोकांमध्ये एकसुत्रीपणा राहणार नाही, राज्यात अराजकता निर्माण होऊ शकते.

थोडक्यात, राज्यसंस्थेशिवाय राज्य टिकु शकणार नाही.

**राज्यसंस्थेची काही महत्वाची कार्ये**

I. देशांच्या सीमांचे संरक्षण करणे

II. देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे

III. समाज विघातक शक्तींचा बिमोड करणे

IV. लोकांचे संरक्षण व त्यांच्या विकासाची कार्ये करणे

V. एकसंघ समाजनिर्मिती करणे

VI. कायदे करणे - कायदयाची अमंलबजावणी करणे

VII. लोकांना योग्य तो न्याय देणे

VIII. औदयोगिकरणामुळे प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे तो प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना करणे

**4.सार्वभौमत्व (Sovereign) :**

भुप्रदेश, लोकसंख्या व शासनसंस्था ही राज्याची महत्वाची अंगे असली तरी सार्वभौमत्वाशिवाय त्यात खरे चैतन्य निर्माण होऊ शकत नाही. राज्यातील सर्व व्यक्ती, गट, संघटना यांच्यावर राज्याचा संपूर्ण अधिकार असला पाहिजे. तसेच ते कोणत्याही राज्याच्या नियत्रणापासुन मुक्त असले पाहिजे तेव्हाच सार्वभौम राज्य निर्माण होते. राज्याला सार्वभौमत्व सत्ता नसेल तर त्याला एखाद्या सर्वसामान्य संस्थेचे स्वरूप येईल. राज्याची सार्वभौम इच्छा शासनसंस्थेमार्फत व्यक्त केली जाते आणि अमलात आणली जाते. तेव्हाच तिला विधिनियमांचा दर्जा प्राप्त होतो आणि असे विधिनियमच राज्यातील प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक असतात.

## 2.2 राष्ट्र (Nation)

'राष्ट्र' या संज्ञेसाठी इंग्रजीत "Nation" शब्द असून या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील "Natio" नेसिया या शब्दापासुन झालेली आहे . "Natio" म्हणजे जन्म किंवा जाति, जन्मलेला म्हणजेच एकाच वंशात जन्मलेले लोक किंवा रक्ताच्या नात्याने बांधलेला मानवी समाज होय. राज्याचा विस्तार एका विशिष्ट सीमेपर्यंतच असतो परंतु राष्ट्राचा विस्तार इतर क्षेत्रातही असु शकतो. 'राज्य' एक राजकीय क्षेत्र आहे तर 'राष्ट्र' सामान्य सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेला समूह आहे . **लॅन्थी व मॅक विलियम्स** यांच्या मताप्रमाणे एक राष्ट्र एक समान संस्कृति, समान चिन्ह, जागतिक संबंधाच्या बाबतीत

एका विशिष्ट दृष्टीकोनातुन वेगवेगळेपणा दर्शवते. राष्ट्राची निर्मिती ऐतिहासिक घटनाक्रम किंवा एक समान भावनेचे फलित आहे. राष्ट्राच्या विकासाची भावना सदैव जागृत असते तसेच राष्ट्रीय संकटावेळी एकत्वाची भावना असते. **ड्युटच (Deutsch**) यांनी काळानुसार राष्ट्रीयता व राष्ट्राचा विकास कसा होतो ते रेखीय पद्धतीने पुढीलप्रमाणे दर्शविले आहे.

समाज (Society) समुदाय (Community) ⟶ जनसमुदाय (People) राष्ट्रीयता (Nationality) ⟶ राष्ट्र (Nation)

जपानमध्ये राहणारे जपानी आहेत. ते जपानी भाषा बोलतात हे त्यांचे सामान्य वैशिष्ट्ये आहे. परंतु जपानी भाषा बोलणारे फक्त जपानमध्येच राहतात असे नाही तर ते इतरत्रही राहतात. हे सर्व लोक जपानी संस्कृतिशी संबंधित आहेत. ते वेगवेगळ्या देशात राहात असले तरी त्यांच्यात सामाजिक व सांस्कृतिक एकता आहे हेच आपल्याला भारताच्या बाबतीतही दिसुन येते. कोणत्याही राष्ट्राच्या निर्मितीसाठी एकतेची व आत्मीयतेची भावना रूजणे गरजेचे आहे. राष्ट्र म्हणजे एकतेच्या व आत्मीयतेच्या भावनेशी निगडीत असलेल्या लोकांची संघटना मानली जाते.

व्याख्या (Definitions) :-

'राष्ट्र' या संज्ञेच्या व्याख्या अनेक विचारवतानी केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे

१) प्रा. बर्जेस :- "भौगोलिक एकता असलेल्या प्रदेशात रहिवास करणारा वांशिक एकता असणारा मानवीसमाज म्हणजे राष्ट्र होय."

२) प्रो. गार्नर :- "राष्ट्र म्हणजे सास्कृतिक, एकजिनसीपणा असलेला सामाजिक गट आहे. जो आपले मानसिक जीवन व आविष्कार याद्वारे एकता टिकविण्यासाठी जागरूक व सज्ज असतो.

३) हेन्स :- “राष्ट्रकाने ऐक्य व सार्वभौम स्वातंत्र्य संपादन केले म्हणजे त्याचे राष्ट्र बनते

४) प्रो. बार्कर :- "विशिष्ट भूप्रदेशावर वस्ती करून राहणारा समुदाय म्हणजे राष्ट्र होय

५) लॉर्ड ब्राईस :- या ब्रिटिश विचारवंताच्या मते, "मानवी समाजातील लोक हे तेथील इतिहास, संस्कृती, भाषा, वाङ:मय इत्यादी वैशिष्ट्यामुळे एकत्रित साधले जातात व त्यांच्यात आपण इतरापासुन वेगळे आहोत अशी भावना निर्माण होऊन आपले स्वातंत्र्य मिळविण्यासाठी किंवा मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी ते झगडतात तेव्हाच त्यांच्यात राष्ट्र उभारते.

" थोडक्यात, "एका विशिष्ट भुप्रदेशात असलेले आणि संस्कृती, इतिहास, धर्म, वंश, भाषा इत्यादी सामाजिक माध्यमाच्या बंधनामुळे एकत्र आलेले लोक म्हणजे राष्ट्र होय "

**राष्ट्रनिर्मितीचे घटक (Factors of The Origin of Nation)**

राष्ट्रीयत्व ही मानसिक भावना असुन लोकांच्या मनामध्ये ज्या घटकांमुळे राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊन दृढ होते त्या घटकांनाच राष्ट्रनिर्मितीचे घटक मानले जाते. "एका विशिष्ट भुप्रदेशात असलेले व संस्कृति, इतिहास, धर्म, वंश, भाषा, इत्यादी सामाईक माध्यमाच्या बधनामुळे एकत्र आलेले लोक म्हणजे राष्ट्र. वरील व्याख्येवरून असे लक्षात येते की, राष्ट्र निर्मितीसाठी काही समान गोष्टींची आवश्यकता असते. या समान गोष्टी म्हणजेच राष्ट्र निर्मितीचे घटक होत ते पुढीलप्रमाणे...

१. सलग भुप्रदेश
२. संस्कृति
३. वांशिक एकता
४. इतिहास
५. भाषा
६. धर्म
७. एकात्म शासनसंस्था
८. समान राजकीय आकांक्षा
९. एकाचे प्रकारचे आर्थिक हितसंबंध
१०. राष्ट्रीयत्व

१. सलग भुप्रदेश

एकाच सलग भूप्रदेशावर पिढयानपिढया राहणान्या लोकांमध्ये आपल्या भूप्रदेशाविषयी आत्मीयता निर्माण होते. समाजजीवनावर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होत

असतो. त्या भूप्रदेशाचे हवामान, तेथील निसर्गाचे स्वरूप याच्याशी लोकांचे जीवन निगडित असते. त्याची लोकांना सवय झालेली असते आपल्या प्रदेशाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांबद्दल त्यांना अभिमान बाटू लागतो समान भौगोलिक परिस्थितीत किंवा सलग भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये विविध प्रकारचे परस्परसंबध निर्माण होतात, सहकार्य निर्माण होते. त्यातून एकात्मतेची भावना वाढीस लागते

२. संस्कृति

समान सांस्कृतिक परंपरेमुळे समाजात एकात्मतेची भावना दृढ होते. प्रत्येक समाजाची काही मूल्ये, श्रद्धा असतात तसेच परंपरा व चालीरीती असतात. त्यातून समाजाच्या संस्कृतीची जडणघडण होते कला, बाड्मय या माध्यमातून त्या संस्कृतीचा आविष्कार होत असतो. सांस्कृतिक एकता असल्यास आपल्या परंपरांविषयी, कला व वाङ्मयाविषयी समाजामध्ये तो अभिमान आणि आदर असतो तो एकात्मतेच्या भावनेला पोषक ठरतो

३. वांशिक एकता

वांशिक एकता राष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक ठरते. माणजेच देशातील लोक एकाच वंशाचे असतील तर त्यांच्यात एकात्मतेची भावना अधिक सहजपणे निर्माण होऊ शकते. अर्थात, आन जगात पूर्णपणे शुद्ध स्वरूपात कोणताह शिल्लक राहिलेला नाही. संशमिश्रण झालेले आहे. त्यामुळे राष्ट्रीयत्वाचा आधार म्हणून वांशिक पटकाचे महत्व फारसे राहिलेले नाही. जगातील बहुतेक सर्व राष्ट्रे मिश्रवंशीय आहेत. एकाच वंशाच्या लोकांचे राष्ट्र ही कल्पना आजच्या काळात कालवा मानावी लागेल.

४.इतिहास

एकच इतिहास असणारा समाज लवकर एकरूप होऊ शकतो गतवैभव पराक्रम, सामुदायिक मान-आपमान यामूळे समाजात एकात्मतेची भावना निर्माणकरता येते. यातूनच राष्ट्र संकल्पना निर्माण होते.

५.भाषा

भाषा हे विचार आणि भावना व्यक्त करण्याचे माध्यम आहे. समान भाषिक लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होणे स्वाभाविक असते कारण ते परस्परांमध्ये विचारांची देवाण-घेवाण सुलभतेने करू शकतात. त्यांच्या भाषेतील वाङ्मय परस्परांत एकात्मतेचे बंध निर्माण करते. आपल्या भाषेच्या वाङ्मयाबद्दल लोकांना आत्मीयता आणि अभिमान असतो. समूह जीवनात भाषेचे जे अनन्यसाधारण महत्व आहे हे लक्षात घेतले तर अनेक राष्ट्राची निर्मिती भाषिक तत्त्वावर झालेली आहे. याबद्दल आश्चर्य वाटत नाही. युरोपातील बहुतेक राष्ट्रे भाषेच्या आधारे निर्माण झाली आहेत. इंग्रजी भाषिकांचे ब्रिटन, फ्रेंच भाषकांचे फ्रांस, जर्मन भाषिकाचे जर्मनी, स्पॅनिश भाषिकांचे स्पेन, पोर्तुगीज भाषिकांचे पोर्तुगाल अशी राष्ट्रे निर्माण झाली आहेत.

अर्थात, जगामध्ये बहुभाषिक राष्ट्रेही आढळतात. भारत, रशिया, स्वितार्लंड, कॅनडा अशी अनेक उदाहरणे देता येतील की, मध्ये एकाहून अधिक भाषिक समूह राहतात; परंतु अशा देशातही एखादी भाषा ही राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारण्याचा प्रयत्न राष्ट्रीय ऐक्य निर्माण करण्यामध्ये भाषा किती महत्त्वाची आहे हेच यावरून स्पष्ट होते

६.धर्म

धर्म हासुद्धा मानवी समूहामध्ये एकोपा निर्माण करणारा अत्यंत प्रभावी घटक आहे. मानवी जीवनावर धर्माचा प्रभाव असतो आणि समान धर्मयामध्ये ऐक्य भावना निर्माण होते यामुळेच धर्माच्या आधारे जगात काही राष्ट्रे निर्माण झालेली दिसतात. भारताच्या शेजारची उदाहरणे द्यायची झाल्यास 'पाकिस्तान' हे इस्लामिक राष्ट्र आहे, 'नेपाल' हे हिंदू राष्ट्र आहे. तर म्यानमार हे बौद्धधर्मीय राष्ट्र आहे मध्य आशियातील सौदी अरेबिया, कुवेत, कतार येमेन इत्यादी बहुतेक राष्ट्रांनी इस्लाम हा राष्ट्रीय धर्म

मानलेला आहे. अर्थात, आधुनिक काळामध्ये धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना उदयाला आलेली असून अनेक राष्ट्रांनी ती स्वीकारलेली आहे. अशा राष्ट्रामध्ये धर्म हा राष्ट्रीयत्वाचा आधार न मानता सर्व धर्मीयांना समान वागणूक आणि समान अधिकार दिले जातात. धार्मिक कारणावरून व्यक्ती व्यक्तीत भेदभाव केला जात नाही अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया इत्यादी सर्व प्रगत राष्ट्रांनी धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारलेले असून भारत हेसुद्धा धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे.

७.एकात्म शासनसंस्था

एकात्म शासनसंस्था एखादया मोठ्या प्रदेशावर एकाच शासन संस्थेचे नियंत्रण असेल तर त्यांच्यामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते

८.समान राजकीय आकांक्षा

धर्म वंश, भाषा अशा अनेक बाबतीत विविधता असूनही राजकीय हितसबंध जर समान असतील तर राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊ शकते. आशिया, आफ्रिका खंडातील देश पारतंत्र्यात असताना साम्राज्यशाहीविरुद्ध या देशात चळवळी झाल्या. या चळवळीमध्ये आपापसातील भेदाभेद विसरून लोक एकत्रितपणे लढले भारतातील स्वातंत्र्य चळवळ हे याचे उत्कृष्ट उदाहरण होय. त्या चळवळीत भारतातील विविध धार्मिक, भाषिक, प्रांतिक लोक सामील झाले. स्वातंत्र्य चळवळीने लोकांमध्ये देशभक्तीची भावना प्रखर बनविली. इतर भेदाभेद दुय्यम ठरले. अशा प्रकारे राजकीय दडपशाहीविरुच झालेल्या आंदोलनातून राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ बनल्याची अनेक उदाहरणे देता येतील.

याचबरोबर राजकीय एकसंघतेमुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकते. समान शासन, प्रशासकीय एकात्मता कायद्यातील समानता, समान राजकीय संस्था यामुळे इतर भेद असूनही समाजात एकात्मता निर्माण होऊ शकते. विविध भाषिक, सांस्कृतिक, वांशिक गट दीर्घकाळ एकाच सत्तेच्या

नियंत्रणाखाली राहिले आणि त्या सत्तेने विविध गटांबाबत उदार आणि समजूतदार धोरण स्वीकारले तर कालांतराने या विविध गटात एकात्मतेची भावना निर्माण होऊ शकते.

९.एकाचे प्रकारचे आर्थिक हितसंबंध

आर्थिक हितसंबंध राज्याच्या वेगवेगळया प्रदेशातील लोकांचे आर्थिक हितसंबंध एकमेकांशी निगडित असतील तर राष्ट्रीय ऐक्याला बळकटी येते. उदाहरणार्थ, भारताच्या वेगवेगळ्या प्रांतात होणारे उत्पादन परस्परांच्या गरजा भागविते पंजाबचा गहू, झारखंडमधील दगडी कोळसा, महाराष्ट्रातील साखर, आसामचा चहा अशी उत्पादने परस्परांच्या गरजा भागवितात. यातून से आर्थिक संबंध निर्माण होतात ते राष्ट्रीय ऐक्याला पोषक ठरतात. दारिद्रय, मागासलेपणा दूर करून आर्थिक संपन्नता प्राप्त करने है अबिकसित देशांसमोरचे अग्रक्रमाचे उद्दिष्ट आहे. आपले राष्ट्र प्रगत आणि आर्थिक समुद्र बनले पाहिजे ही लक्ष राष्ट्रीय ऐक्य बळकट करणारी ठरते

१०.राष्ट्रीयत्व

जनतेत आध्यात्मिक व मानसिक स्वरूपाची एकी असते तेव्हा त्यांच्यात राष्ट्रीयत्व निर्माण झाले असे समजले जाते. राष्ट्रीयत्व निर्माण झालेला समाज तर प्रतांत्रात असेल तर स्वातंत्र्य मिळवण्यासाठी परकिय सत्ता नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करतो. 18 व्या शतकाच्या शेवटी उ. अमेरिकेत अशी भावना निर्माण झाली तेव्हाच त्यानी ब्रिटिशांशी संघर्ष पत्करला त्यामुळे अमेरिकन राष्ट्र हे 1776 मध्ये जन्मास आले. ब्रिटिश राज्य भारतात प्रस्थापित होण्यापूर्वी या देशात एक राज्य-राष्ट्र ही भावना नव्हती. 19 व्या शतकाच्या शेवटपर्यत सर्व भारतीय एक आहोत अशी भावना नव्हती. टिळक, गांधी गोखले, दादाभाई नौरोजी यांनी आपण सर्व भारतीय आहोत ही भावना निर्माण केली व स्वातंत्र्य मिळेपर्यंत ज्वलंत ठेवली. त्यातूनच राष्ट्रीची निर्मिती झाली. अशाप्रकारे कोणतेही राष्ट्र वरील घटकाशिवाय निर्माण होऊ शकत नाही. वरील घटकानुसार वेगवेगळी राष्ट्रे निर्माण झालेली आहेत.

**राज्य व राष्ट्र यातील फरक (Distinction Between the State and Nation)**

राज्य आणि राष्ट्र हे दोन्ही शब्द व्यवहारात सामान्यपणे एक समान अर्थानेच वापरले जातात. परंतु या दोन्ही शब्दांमध्ये खुप फरक आहे. राज्य आणि राष्ट्र ह्या दोन्ही संज्ञा परस्परांपासून भिन्न आहेत. त्यातील फरफ पुढीलप्रमाणे

१) राज्य एक राजकीय समुदाय / समाज (Political Community) आहे तर सांस्कृतिक संमिश्रण (Calturalties) हे राष्ट्राचे एक वैशिष्ट्य आहे.

२) भुप्रदेश, लोकसंख्या, शासन यंत्रणा हे राज्यसंस्थेचे महत्वाचे घटक आहेत. तर राष्ट्रभावना क्षेत्रीय स्वरूपाची नसते ती एक सर्वोच्च मानवी भावना असते

३) राज्याला क्षेत्रीय घटक असतो. म्हणजेच राज्याचे स्वतःचे असे विशिष्ट क्षेत्र / भुप्रदेश असते. राष्ट्राला क्षेत्रीय घटक असेलच असे नाही. ज्यु, बलुची, पठाण, कुर्ड, बसक हे लोक जगातील अनेक देशांमध्ये राहतात. त्यांना विशिष्ट असा भुप्रदेश नाही.

४) राज्यात न्यायशास्त्रसंमत व्यवस्था असते, राष्ट्रात राजनियमन असतेच असे नाही.

५) राज्य एक कायदेसंमत तत्व आहे तर राष्ट्र भावनात्मक तत्व आहे.

६) राज्याची एकता तेथील राजकीय व्यवस्थेशी संबंधित असते तर राष्ट्राची एकता/राष्ट्रीय एकता भाषा, जाती इत्यादींवर आधारीत असते. धर्म,

७) राज्य हे सार्वभौम व स्वतंत्र असते, राष्ट्र हे सार्वभौम असेलच असे नाही.

८) राज्यात एकाच प्रकारची शासन व्यवस्था असते परंतु राष्ट्राच्या बाबतीत सर्वत्र एकाच प्रकारची शासन व्यवस्था असणे जरूरीचे नाही.

९) राज्यातील लोकांची निष्ठा राज्याशी असते तर राष्ट्रातील लोकांची निष्ठासंस्कृतीशी आढळते.

१०) राज्यातील मानवसमुह राजकीयदृष्ट्या सुसंघटित असतो. राष्ट्रातील मानवसमुह राजकीयदृष्टया असंघटित व आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या कमकुवत असतो.

११) राज्यातील लोक सुनिश्चित अशा सीमारेषेच्या अंतर्गत प्रदेशात राहतात. परंतु परतंत्र राष्ट्रातील ज्यु, बलुची, पठाण, कुर्दीश हे लोक विविध देशांच्या सीमाप्रदेशात (Frontiers) राहतात.

१२) राज्यात काही प्रतीके असतात. उदा. अशोकचक्र, स्वस्तिक, ओम इत्यादी. राष्ट्रात अशी प्रतीके असतीलच असे निश्चित नसते.

१३) राज्यात अनेक भाषिक लोक राहतात. तर बहुतेक राष्ट्रात एकभाषिक लोक आढळतात. उदा. जपान, संयुक्त संस्थाने.

१४) राज्याला सरकार व सार्वभौमत्व ह्या गोष्टी आवश्यक आहेत. राष्ट्राला त्या गोष्टी नसल्या तरी राष्ट्र राहू शकते.

१५) राज्यात सांस्कृतिक, वांशिक, भाषिक, धार्मिक, भिन्नता आढळते. राष्ट्रात हे सर्व घटक समान असतात. उदा. जपान, पोलंड.

१६) राज्य हि वस्तुनिष्ठ कल्पना आहे ती एक राजकीय संघटना आहे. तर राष्ट्र ही व्यक्तीनिष्ठ व भावनिक कल्पना मानली जाते. राष्ट्रीयत्व ही मानसिक व भावनिक स्वरूपाची आहे. राष्ट्रीयत्वाची भावना लोकांच्या मनात निर्माण होते.

अशा प्रकारे राज्य व राष्ट्र यातील फरक स्पष्ट केला जातो. एखाद्या राज्यात कमाल एकता व स्थिरता अशा वेळी संभव असते की, जेव्हा ते राज्य एका राष्ट्राशी अधिक व समान संबंधित असेल.

थोडक्यात, राज्य व राष्ट्र ह्या भिन्न संज्ञा असुन त्या परस्पर पुरक आहेत. राष्ट्रीयतेवर आधारीत असलेले राज्य तुलनेने राष्ट्रीयतेवर आधारीत नसलेल्या राज्यांपेक्षा प्रगतिशील व बलाढ्य असते.

## 2.3 सीमारेषा/सरहद्द (Boundary)

सीमारेषा या क्रत्रिम मानवनिर्मित असतात. सीमारेषांची निर्मिती ही अलिकडच्या काळात झालेली आहे. सीमा ही रेषा असलाने तेथे वस्ती करता येत नाही. तेशील नैसर्गिक साधनांचा वापर करता येत नाही. सीमेजवळ सैन्य नेहमी सीमेच्या संरक्षणासाठी "तैनात असते. सीमारेषांना निश्चितपणा व नेमकेपणा असतो त्या मनुष्य निर्मित असतात. सीमांना, Boundary line, Border Line किंवा line of Limit असे म्हणतात. सीमारेषा या मानवाने निश्चित केलेल्या रेषा आहेत. त्या प्रदेशाचे विभाजन करतात. राज्यसंस्थांना एकमेकांपासुन अलग करतात. नकाशावर सीमा वेगवेगळ्या सांकेतिक चिन्हांच्या सहाय्याने दर्शविलेल्या असतात.

**व्याख्या (Definitions) :-**

१.प्रा. पॉण्डसनुसार, 'आधुनिक सीमा या अचुक रेषा आहेत, ज्यामुळे दोन वेगवेगळया सौर्वभोमत्वांचे देश एकत्र येतात.'

२.प्रा. ए. ई. मुडी यांच्यानुसार 'राज्याच्या सरहद्दीवर काढलेल्या रेषा म्हणजे सीमा रेषा होय.'

३.प्रा. कार्लसन यांच्या मते 'सीमा भूप्रदेशाच्या बाहेरील हद्द दर्शवितात व त्यात सार्वभौमत्वाचा देश असतो.'

थोडक्यात, काही विचारवंतांच्या मते, सीमा रेषा म्हणजे, दोन राज्यांच्या किंवा राष्ट्रांच्या दरम्यान करारानुसार ठरलेली रेषा म्हणजे सीमा होय.

एखाद्या राज्यास किंवा राष्ट्रास दुसऱ्या राज्यांपासुन किंवा राष्ट्रापासुन अलग करणारी रेषा म्हणजे सीमा रेषा होय. राष्ट्राराष्ट्रातील विभाजक रेषा म्हणजे सीमा होय. ती स्तंभ, दगड,

इमारत, तारांचे कुंपण, भिंत इत्यादींच्या सहाय्याने दाखविली जाते, व्यक्त केली जाते. काही वेळेस त्या नैसर्गिक घटकांच्या किंवा प्राकृतिक स्थलाकृतीच्या साहाय्याने दर्शवितात. सीमारेषांवरून राष्ट्राराष्ट्रात किंवा राज्याराज्यात संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. सीमारेषांचे काटेकोर पालन केल्याने असे संघर्ष होत नाहीत. सीमांचे उल्लंघन करणे हा कायदेशीर गुन्हा ठरतो.

**सीमांचे प्रकार (सीमांचे वर्गीकरण) : (आंतरराष्ट्रीय सीमांचे वर्गीकरण) :**

सीमांचे वर्गीकरण तीन प्रकारात करता येते. ते पुढीलप्रमाणे...

१) आकृतीमुलक सीमारेषा (Morphological Boundaries)

२) उत्पत्तीमुलक सीमारेषा (Genetical Boundaries)

३) संमिश्र सीमारेषा (Complex Boundaries)

१) आकृतीमुलक सीमारेषा (Morphological Boundaries) :

भौगोलिक पर्यावरणातील स्थिर व कायमस्वरूपी घटकांच्या सहाय्याने आरेखित केलेल्या सीमांना आकृतीमूलक सीमा असे म्हणतात. भौगोलिक पर्यावरणात घटकांचा आकार जसा असेल त्याप्रमाणे सीमारेषांना विशिष्ट असा आकार प्राप्त होतो म्हणून त्यांना आकृतीमुलक किंवा रचनामुलक किंवा रूपाकार सीमा असे म्हणतात.या सीमारेषांचे खालील तीन उपप्रकार पडतात.

अ) नैसर्गिक सीमा (Natural Boundaries)

ब) सांस्कृतिक सीमा (Cultural Boundaries)

क) ज्यामितिय सीमा (Geonetric Boundaries)

अ) **नैसर्गिक सीमा (Natural Boundaries) :**

पर्वत, पठारे, टेकड्या किंवा जलविभाजक, नद्या, सरोवरे, दलदल, अरण्ये, वाळवंट इत्यादी नैसर्गिक घटकांच्या मदतीने आरेखित केल्या जाणाऱ्या सीमांना नैसर्गिक किंवा प्राकृतिक सीमा असे म्हणतात. वरील सर्व नैसर्गिक घटक फार काळपर्यंत बदलरहित असल्याने या घटकांच्या साहाय्याने आधारेखित केलेल्या सीमा स्थिर आणि सुस्पष्ट असतात. नैसर्गिक सीमाचे पुढील प्रकारे उपप्रकार पडतात.

1) जलसीमा

II)पर्वतीय सीमा

III) वने, वाळवंटे व दलदलीच्या साहाय्याने सीमा,

**1) जलसीमा :**

नदी, सरोवरे, व महासागर इत्यादींच्या सहाय्याने दर्शविलेल्या सीमा रेषांना जलसीमा असे म्हणतात. नदीच्या सहाय्याने ठरविलेल्या कोणत्याही देशांच्या राजकीय सीमा या नदीसीमा म्हणुन ओळखल्या जातात. नदीखोऱ्यांमध्ये मानवी जीवन व मानवी संस्कृती समृद्ध होते. जगातील काही नद्या राजकीय विभागांना एकत्रही आणतात किंवा अलगही करतात. नदीचा सीमा म्हणुन विचार करताना नदीचे काठ, नदीपात्राचा मध्यभाग, जलवाहतुकीस योग्य असा भाग इत्यादी घटक विचारात घेतले जातात व त्यावरून सर्वसंमतीने कायदेशीररित्या जलसीमा आखल्या जातात. नदीचे काठ लक्षात घेवुन ज्या सीमारेषा आखल्या जातात त्यावरून वाद व संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते म्हणून शक्यतो नदीच्या काठांचा वापर करून सीमा ठरवल्या जावु नये. नदीच्या काठावरून सीमा ठरवितांना नदीच्या पाण्याचा वापर मत्सव्यवसाय, जलवाहतुक, वीजनिर्मिती या घटकांचा विचार करावा लागतो. यावरून एखाद्या राज्यसंस्थेवर अन्याय होण्याची संभावना असल्याने शक्यतो दोन राजसंस्थांमधील सीमा ठरवितांना

नदीच्या काठाचा उपयोग सहसा केला जात नाही. बऱ्याचदा नदीसीमा नदीचे पात्र बदलल्यामुळे बदलू शकते. त्यामुळे नदीच्या मध्यपात्रात असलेली सीमा सरकते त्यावरून नंतर संघर्ष निर्माण होतात. **उदाहरणार्थ, संयुक्त संस्थाने व मेक्सिको यांची सीमारेषा रिआ ग्रैंड नदीवर आहे.** या नदीचे अनेकवेळा पात्र बदलले आहे. भारतातील उत्तरप्रदेश व बिहारमध्ये घागरा व गंगानदीच्या वारंवार पात्र बदलामुळे वाद निर्माण झाला होता. त्रिवेदी कमिशनच्या साहाय्याने हा वाद १९६८ मध्ये मिटविण्यात आला. दुसरे उत्तम उदाहरण इराण-इराक यामधील असलेली सतलज अरब हि नदी दोन्ही देशांमधील आंतरराष्ट्रीय सीमा आहे. तेलवाहू जहाजांद्वारा होणारी जलवाहतुक आणि या नदीच्या वापरावरून होणारे संघर्ष यामुळे दोन देशांमधील राजनैतिक संबंध बऱ्याचदा बिघडले होते. एखादी नदी घळीतुन वाहत असल्यास त्याच्या सीमेवरूनही वाद निर्माण होतात. वाहतुकीस योग्य अशा पात्राचा विचार करून जलसीमा आखल्या जातात. पण नदीपात्राच्या वारंवार बदलामुळे नदीवरून आखल्या जाणाऱ्या सीमा संघर्ष निर्माण करू शकतात. नदीसीमा ह्या क्लिष्ट स्वरूपाच्या असतात. काही नद्या विभाजना ऐवजी एकीकरणाचेही कार्य करतात. हाईन व डॅन्युब या युरोपातील प्रमुख दोन नद्या व्यापारी दृष्टीकोनातून उपयुक्त असल्याने त्या युरोपातील देशांना एकत्र आणण्याचे कार्य करतात.

दोन देशांच्या सीमा प्रदेशात सरोवरे असल्यास त्या सरोवराच्या किंवा जलाशयाच्या पाण्याचा वापर दोन्ही देशांना करता यावा म्हणून सरोवराच्या किवा जलाशयाच्या मध्यभागी सीमारेषा निश्चित केलेली असते. कॅनडा, व संयुक्त संस्थाने यांच्या दरम्यान सरोवरीय सीमा रेषा आहे. या सीमेची लांबी सुमारे १६०० कि. मी. एवढी आहे. हि सीमा रेषा सुपिरियर, औंट्यारियो, ह्युरॉन व ईरि या सरोवरांमधुन आखलेली (निश्चित केलेली) आहे.

आफ्रिकेतील झांबिया व झिंबाग्वे या दोन देशांच्या दरम्यान 'करीबा' सरोवर असुन त्यातुन जाणारी त्यांची आंतरराष्ट्रीय सीमा अधोरेखित केलेली असून ही सीमारेषा आखतांना

सरोवरातील पाण्याची खोली व मत्स्यव्यवसाय यांचा दोन्ही देशांना फायदा होईल हे विचारात घेवून निश्चित केलेली आहे.

युरोपातील जर्मनी, स्वित्झलँड व ऑस्ट्रिया यांच्या दरम्यान कॉन्स्टेन्स सरोवरातून आंतरराष्ट्रीय सीमारेषा आखलेली आहे.

महासागर या घटकाचाही जलसीमा ठरवितांना आधार घेतला जातो. पण यावरून सुद्धा अनेकदा संघर्ष निर्माण होतात. स्मगलिंग, मासेमारी, हेरगिरी यावरून संघर्ष निर्माण होतात.

**II) पर्वतीय सीमा :**

पर्वतरांगा, टेकड्या व जलविभाजक यांच्या सहाय्याने आखल्या गेलेल्या सीमांना पर्वतीय सीमा असे म्हणतात. पर्वतीय सीमा ह्या निश्चित, कायम स्वरूपाच्या व अत्यंत अचुक अशा समजल्या जातात. पर्वतांच्या किंवा जलविभाजकांच्या दोन्ही बाजुस दोन वेगवेगळे समाज असु शकतात की ज्यांची संस्कृती ही एकमेकांपासुन भिन्न असू शकते. जलविभाजक रेषा ओलांडुन एकमेकांवर आक्रमण करणे पूर्वीच्या काळी तितकेसे सोपे नव्हते पण अलिकडील युद्धांचे बदलते स्वरूप, अत्याधुनिक व घातक शस्त्रास्त्रे यामुळे सीमांचा भेद करून आक्रमण करणे सोपे झाले.

जलविभाजक हे अंत्यत दुर्गम असतात. त्यांना लांबी आणि रूंदी खुप असते. त्यामुळे जलविभाजकानुसार सीमा निश्चित झाल्यानंतर त्यात सहसा बदल होत नाही.

काही पर्वतश्रेणी माथ्यावर नेहमीच हिमाच्छादित व घनदाट जंगलांनी युक्त असतात. तेथे सीमारेषा ठरवितांना वाद होतात, अडचणी येतात. तर काही पर्वतश्रेणी खोल व अरूंद दऱ्यांमुळे दुर्गम असतात त्याठीकाणी सुद्धा सीमारेषांचे निर्धारण कठीण असते. अशा सर्व पर्वतीय सीमांबाबत सतत बाद व संघर्ष होत असतात. उदा. चिली-अर्जेंटिना मधील ॲण्डिज पर्वतश्रेणी, भारत-चीन दरम्याची हिमालय पर्वतश्रेणी या वादग्रस्त सीमा असुन सतत संघर्षाची परिस्थिती व युद्धजन्य परीस्थिती निर्माण होत असते.

नॉर्वे स्वीडन, फ्रान्स-स्पेन, स्वित्झरलँड-फ्रान्स इत्यादी अशी काही देशांची उदाहरणे आहेत की त्यांच्यामध्ये पर्वतीय सीमा आरेखिता केलेल्या आहेत. पर्वतीय प्रदेशातील हिमनद्या, नेहमी पडणारा पाऊस, जंगले, दलदल, अरूंद व खोल दऱ्या यामुळे सीमेची आखणी करणे कठीण असते.

**III) वने, वाळवंटे व दलदलीच्या साहाय्याने सीमा :**

वंनानी युक्त असलेले प्रदेश, वाळवंटे व दलदल या नैसर्गिक घटकांच्या सहाय्याने सीमा ठरविल्या जातात. हे नैसर्गिक घटक वाहतुकीस व लोकवस्तीस प्रतिकूल समजले जातात. तसेच या नैसर्गिक घटकांच्या दोन्ही बाजुस वास्तव्य करणाऱ्या मानवी समुहाची सामाजिक व सास्कृतिक गुण वैशिष्ट्ये वेगवेगळी असु शकतात. उदा. आफ्रिकेतील सहारा वाळवटामुळे भुमध्यसागरी किनाऱ्यावरील मानवी समुदाय व सॅव्हाना गवताळ प्रदेशातील मानवी समुदाय यांच्यात विभिन्नता दिसुन येते.

रशियातील सैबेरियाचा प्रदेश व फिनलँड यांच्या सीमेवर सुचिपर्णी अरण्ये किंवा तैगा अरण्ये दिसुन येतात. यामुळे रशिया, फिनलँड व पोलंड यांच्या सीमा परस्परांपासुन वेगळ्या झालेल्या आहेत.

ऱ्हाईन व म्युस नदी दरम्यान असलेल्या दलदलच्या अस्तित्वामुळे बेल्जियम व हॉलंड यांच्यात अलगता निर्माण झालेली आहेत.

भारत व पाकीस्तान यांच्या दरम्यान भारताच्या कच्छचे रण या भागात दलदलीचा प्रदेश आहे. या दलदलीच्या प्रदेशामुळे लष्करी हालचालींना प्रतिबंध होतो. त्यामुळे दलदलीच्या प्रदेशास महत्व प्राप्त झाले आहे. येथे नैसर्गिक वायु व खनिज तेलाचे साठे असण्याची शक्यता आहे.

**ब) सांस्कृतिक सीमा (Cultural Boundaries) :** ज्या सीमारेषा धर्म, भाषा, वंश, राष्ट्रीयता इत्यादी सांस्कृतिक घटकांच्या साहाय्याने ठरविल्या जातात त्या सीमारेषाना सांस्कृतिक सीमारेषा असे म्हणतात. या सीमारेषांना मानववंश भूगोलीय सीमा असेही संबोधतात. या सीमांमुळे विभागणी काटेकोर झाली नाही तर धार्मिक, भाषिक, वशिय तेढीमुळे सामाजिक सलोखा नष्ट होऊन राजकीय संघर्ष विकोपास जावून युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊन प्रसंगी दोन राज्यसंस्थामध्ये युद्धेसुद्धा होतात. बहुतेक दोन राष्ट्रामधील आंतरराष्ट्रीय सीमा ह्या साकृतिक सीमा असुन त्यामुळे भिन्न सांस्कृतिक गुणधर्म असलेली मानवी समुह अलग होतात भारत, पाकीस्तान, म्यानमार याच्यातील सीमा ह्या सांस्कृतिक सीमचे उत्तम उदाहरणे होय यु. एस. ए. व मॅक्सिको यांच्या दरम्यान सांस्कृतिक सीमा वांशिक सीमा आहे. भारतातील प्रांतीय रचना ही 'भाषिक' या मुलभुत सांस्कृतिक घटकावर आधारलेली आहे.

**क) ज्यामितीय सीमा (भूमितीय सीमा) (Cultural Boundaries) :** अक्षवृत्ते व रेखावृत्तांना समांतर अशा काही सीमा रेषा नकाशावर सरळ रेषानी दाखविचलेल्या असतात त्यांना भूमितीय किंवा ज्यामितीय सीमा असे म्हणतात. भूमितीच्या आधारावर या सीमा ठरविण्यात येतात. संयुक्त संस्थानातील अनेक घटक राज्याच्या सीमा ह्या भुमितीय सीमा आहेत. आफ्रिकेतील काही घटक राज्यसंस्थांच्या सीमा याच प्रकारच्या आहेत. जेव्हा एखादा प्रदेश आर्थिकदृष्ट्या अजिबात उपयोगाचे नसतात त्यामुळे व सीमा आखणीचे काम जलद व्हावे म्हणून सरळ रेषांचा उपयोग करून सीमाचे निर्धारण करण्यात आले. ह्या सीमारेषा आखताना भुमितीय दृष्टीकोनातुन विचार करून त्या आखल्या जातात. या सीमा बऱ्याचदा वर्तुळ वक्राच्या साहाय्यानेही दर्शविल्या जातात. ज्यामितीय सीमांची आखणी झाल्यानंतर कालांतराने हळूहळू लाकवस्ती निर्माण होते. ऑस्टेलियातही ज्यामितीय सीमा दिसुन येतात, त्यांच्या आधारे ऑस्ट्रेलियातील प्रादेशिक विभाग केलेले आहेत.

**२) उत्पत्तीमूलक सीमा (Genetic Boundaries) :** हार्टशोर्न हे प्रसिद्ध अमेरिकन भूगोलतज्ञ होवून गेले. इ.स. १९३६ मध्ये त्यांनी राजकीय सीमांविषयी एक अभ्यासपूर्ण, अर्थपूर्ण लेख लिहीला. त्या लेखात त्यांनी उत्पत्तीनुसार किंवा निर्मितीनुसार सीमांचे वर्गीकरण केलेले आहे. सीमा व त्या प्रदेशातील विविध सांस्कृतिक भूदृष्ये यांचा परस्पर संबंध असून या सांस्कृतिक भूदृष्यांच्या विकासावर सीमांचे वर्गीकरण आधारित आहे. या अध्ययनात सीमांचे वर्गीकरण करतांना सीमा उत्पत्तीचा काळ लक्षात घेतला आहे. **हार्टशोर्न** यांनी सीमांचे उत्पत्तीनुसार सीमांचे खालील पाच उपप्रकार सांगितले आहेत.

i) पूर्वनिर्धारित / पूर्ववर्ती (Antecedent) सीमा

ii) परवर्ती/स्वभोद्भूत/अनुवर्ती (Subsequent) सीमा

iii) पूर्वारोपित (Superimposed) सीमा

iv) अनुगामी (Consequent) सीमा

v) अवशिष्ट (Relict) सीमा

**i) पूर्वनिर्धारित / पूर्ववर्ती सीमा:-** एखाद्या प्रदेशात सांस्कृतिक घटकांचा विकास होण्यापूर्वीच त्या प्रदेशात सीमांची आखणी झालेली असेल तर त्या सीमेस पूर्वनिर्धारित किंवा पूर्ववर्ती सीमा असे म्हणतात. मानवी वस्ती निर्माण होण्यापूर्वीच अशा सीमांची आखणी झालेली असल्याने ह्या सीमा सरळ व रेखात्मक स्वरूपाच्या आखल्या जातात. ह्या सीमा आखल्या गेल्यानंतर तेथे वस्त्या निर्माण होवून रस्ते, रेल्वे, विमानतळ, उद्योगधंदे अशा भूदृष्यांचा विकास होतो. संयुक्त संस्थाने व कॅनडा या दरम्यानची सीमा ही पूर्ववर्ती सीमा होय.

**ii) परवर्ती / स्वभोद्भूत/ अनुवर्ती सीमा :-** एखाद्या प्रदेशात प्रथम सांस्कृतिक घटकांचा विकास होतो त्यानंतर त्या प्रदेशात सीमेची आखणी केली जाते त्या सीमेस परवर्ती सीमा असे म्हणतात. या सीमेच्या दोन्ही बाजूला जी मानवी वस्ती असते त्यांच्यात नेहमी सांस्कृतिक व आर्थिक देवाण घेवाण सुरू असते.

भारत-पाकिस्तानमधील सीमा ही धार्मिक तत्त्वावर आधारित असल्याने ही सीमा परवर्ती सीमा होय. भारतातील बहुतेक घटक राज्याची निर्मिती ही भाषिक तत्त्वावर झालेली असल्याने त्या राज्यांमधील सीमा ह्या परवर्ती सीमा होय.

**iii) पूर्वारोपित सीमा :** या सीमेला अध्यारोपित सीमा असेही म्हणतात. या सीमांची आखणी सांस्कृतिक भूदृष्ये निर्माण झाल्यावरच केली जाते. या सीमा आखतांनाचा विशिष्ट असा हेतू नसतो. दोन राष्ट्रातील संघर्षानंतरसुद्धा शस्त्रसंधीनंतर पूर्वारोपित सीमाची आखणी केली जावू शकते. राजकिय उद्दीष्ट्ये व हेतू साध्य करण्यासाठीसुद्धा अशा सीमांची आखणी केली जाते. बऱ्याचदा पूर्वारोपित सीमांबाबत वाद सुरू असतात व त्यावरूनसुद्धा युद्धजन्य परिस्थिती उद्भवत असते. अशा पूर्वारोपित सीमाची अनेक उदाहरणे देता येतील. भारत व पाकिस्तान दरम्यान असलेली सीमारेषा ही पूर्वारोपित सीमा होय. उत्तर दक्षिण कोरिया याच्यातीलपूर्वारोपित सीमा वादग्रस्त ठरली आहे.

**iv) अनुगामी सीमा :-** सीमा रेषा ज्यांची निर्मिती ही पर्वत, पठार, दलदल, जंगल इत्यादी नैसर्गिक घटकांच्या अवरोधामुळे झालेली आहे त्यांना अनुगामी सीमा असे म्हणतात. या सीमांचे स्वरूप अतिशय दुर्गम असल्याने सीमांच्या दोन्ही बाजूस असलेल्या मानवी समुहामध्ये परस्पर संबंध फार कमी असतात त्या व्यापार, दळणवळण व वाहतूकीस अनुकूल नसतात. उदा. भारत व तिबेट दरम्यानची अनुगामी सीमा ही दुर्गम हिमालयीन पर्वतश्रेणीमुळे अभेद्य आहे.

**v) अवशिष्ट सीमा :** जगातील काही महासत्ता ह्या प्रबळ असल्याने त्यांच्या शेजारी ज्या लहान-लहान राजवटी असायच्या त्यांच्यावर त्या महासत्ता युद्ध लादून त्या नष्ट करायच्या. अशा लहान-लहान राजवटी नष्ट झाल्यावर सुद्धा त्या राजवटींच्या संस्कृतीचा प्रभाव टिकून राहत होता व त्यामुळे तेथील इतिहास प्रकाशझोतात येत होता. महासत्ता व नष्ट झालेल्या लहान-लहान राजवटी यांच्याबाबतीतील सांस्कृतिक वेगळेपणा ठळकपणे अधोरेखित केला जात होता. हा सांस्कृतिक वेगळेपणा अधोरेखित करणारी

महासत्ता व राजवटी यांच्या दरम्यानची सीमा रेषा म्हणजे अवशिष्ट सीमा होय. उदा. गोव्याची सीमा पोर्तुगीज राजवटीच्या खाणाखुणा दर्शविते. महाराष्ट्रात शिवशाही व पेशवाईच्या हद्दी लक्षात येतात.

**३) मिश्रीत सीमा (संमिश्र सीमा) :** जगातील काही राष्ट्रांच्या सीमा अशा आहेत की ज्यात दोन किंवा दोहोंपेक्षा जास्त सीमांचे वैशिष्ट्ये दिसून येतात. उदा. संयुक्त संस्थाने व कॅनडा यांच्या दरम्यान अक्षवृत्तास अनुसरून जी ज्यामितीय सीमा रेषा आहे तीच सीमारेषा पुढे सरोवर व नदीच्या साहाय्याने दर्शविली असल्याने ती नैसर्गिक व सांस्कृतिक भूदृष्ये किंवा घटक लक्षात घेवून त्या दोन्ही घटकांची (नैसर्गिक व सांस्कृतिक) वैशिष्ट्ये त्या एकाच सीमारेषेत सिमित असतात.

**2.4 सीमाप्रदेश (सीमांत) (सरहद्दप्रांत)(Frontiers) :**

सीमाप्रदेश किंवा सरहद्द किंवा सीमांत हे तिन्ही एकाच अर्थाचे शब्द आहेत. इंग्रजीत त्यांना (Frontiers) असे म्हणतात. Frontiers या लॅटीन शब्दापासुन व Front या फ्रेंच शब्दापासुन या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. सम्मुख प्रदेश किंवा सरहद्द प्रांत म्हणजेच 'दर्शनी अग्रभाग' असा त्याचा अर्थ होय.

**व्याख्या (Definitions) :-**

१.प्रा. ए. ई. मुडी यांच्या मते, 'सरहद्द प्रांत (सीमा प्रदेश) म्हणजे एखादा पट्टा किंवा सरहद्दीचा विभाग होय'. (Frontiers are zones or belts of Territory)

२.प्रा. पॉण्डस यांच्या नुसार, सीमा प्रदेश म्हणजे असा सरहद् विभाग ज्यावर कोणाचाही दावा नाही, त्याचा उपयोग केला जात नाही, त्यात वस्ती नसते पण दोन्ही विभागातील लोक त्यात प्रवेश करू शकतात पण हक्क सांगू शकत नाही आणि कोणत्याही विभागाचा त्यावर हक्क नाही.'

३. गोबलेट यांच्या मतानुसार, सरहद्द हा एक विशिष्ट भौगोलिक स्थिती असलेला भुप्रदेश असुन त्यात विरोधी राज्यशक्तींना आपला विस्तार वाढविण्यास प्रतिरोध होत असतो व तेथे तटस्थी युक्त स्थिती असते.

४.' ब्रिटीश भौगोलिक शब्दसंग्रहानुसार, 'सीमाप्रदेश म्हणजे दोन शेजारी राष्ट्रांच्या दरम्यान असलेला कोणाच्याही मालकीचा नसलेले निर्मनुष्य क्षेत्र होय.

दोन राष्ट्रांमधील सीमा प्रदेशात फारसे सांस्कृतिक भेद दिसत नाहीत. सीमा प्रदेश भौगोलिक किंवा नैसर्गिक, असतात. भारताच्या दृष्टीने हिमालय पर्वत हा सीमाप्रदेशच होय. जे प्रदेश दुर्गम असतात अशा प्रदेशांमध्ये मानवीजीवन सहसा आढळत नाही. ते सर्व प्रदेश सीमाप्रदेश म्हणून ओळखले जातात. ते क्षेत्रात्मक असतात.

**सीमांचे वर्गीकरण (Classification of Frontiers ):** सीमेची विकास प्रक्रिया आणि वर्तमानकाळाच्या वैशिष्ट्यानुसार सीमांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करतात

**(१) नैसर्गिक सीमा (Natural Frontiers) :** प्राचीन कालीन संकल्पनांच्या रूपामध्ये नैसर्गिक सीमा मानली जात होती. जेव्हा राज्यांचा कार्यात्मक अंगाच्या रूपात विकास झालेला नव्हता तेव्हा राज्याच्या क्षेत्रात चतुर्दिक प्राकृतिक बाधेपासून युक्त क्षेत्र तसेच सोडले जाईल. त्या काळी राज्याची सुरक्षा आवरणाच्या स्वरूपामध्ये होती. परंतु वर्तमानकाळात परिवहन आणि आर्थिक विकासाच्या कारणांमुळे नैसर्गिक सीमा लुप्त होत चालल्या आहेत. सीमांच्या मध्यभागामध्ये रेषा काढली जाते. जी राज्याच्या सार्वभौमत्वाची अंतिम सीमा असते परंतु योगायोगाने राज्याच्या सीमेलगत विस्तृत पर्वतीय प्रदेश, दलदल किंवा वाळवंटी प्रदेश असल्यास ती नैसर्गिक सीमा राखली जाते. आवगमन आणि आर्थिक विकासाच्या सीमित स्थितीमुळे दोन राज्यांचे सार्वभौमत्व तेथे निष्क्रिय क्षेत जाते. तेथे नैसर्गिक सीमा विभाजकाचे कार्य करतात.

**(२) सांस्कृतिक सीमा (Cultural Frontiers) :** सांस्कृतिक सीमा जेव्हा कोणत्याही राज्याच्या सीमावर्ती क्षेत्रामध्ये मिन्न सांस्कृतिक समुदायाचे क्षेत्र असते किंवा असा कोणताही वांशिक, सांस्कृतिक समूह असतो की, ज्याचा विस्तार जवळच्या राज्यातदेखील आढळतो तेव्हा सांस्कृतिक सीमेचा विकास

होतो. अशा परिस्थितीत सांस्कृतिक संक्रमणाचे क्षेत्र दोन्हीपैकी कोणत्या तरी एका राज्यामध्ये विलीन होऊ शकते किंवा दोन्ही राज्यांच्या दरम्यान एक नवीन राजकीय अंगाच्या रूपामध्ये विकसित क्षेत जाते. उदाहरणार्थ, इराकमध्ये कुर्दीस्थान क्षेत्र.

**(३) राजकीय सीमा (Political Frontiers) :** विविध शक्तिशाली राजकीय अंगाच्या सीमांत क्षेत्रापासून अलग केली गेलेली एक राजकीय सीमा होऊ शकते. वर्तमानकाळात याची उदाहरणे फारशी नाहीत, परंतु परिवर्तीय रूपामध्ये सीमांत मध्यमगत राज्यांची (Buffer State) भूमिका निभावतात.

**(४) भौगोलिक सीमा (Geographical Frontiers)** वास्तवतः सर्व सीमा भौगोलिक आहेत. परंतु या ठिकाणी भौगोलिक सीमा राज्याच्या सीमावर्ती भागांमध्ये संबंधित आहेत, जेथे लोक निवास आणि आर्थिक विकासापासून वंचित असतात. कालांतराने अत्याधिक दबावामुळे सीमावर्ती क्षेत्रात आपला आर्थिक विकासाचा विस्तार करण्यास प्रारंभ करतात. यांना 'निवासीय सीमा' असेदेखील म्हणतात.

### ४.४. सीमारेषा व सीमाप्रदेशातील फरक (Difference between Boundaries and Frontiers)

१) सीमारेषा ह्या मानवनिर्मित असतात. सीमाप्रदेश हे नैसर्गिक अथवा भौगोलिक असतात

२) सीमारेषा ह्या रेषात्मक असतात. सीमाप्रदेश क्षेत्रात्मक असतात.

३) सीमारेषा ही केंद्राभिमुख शक्ती चे दयोतक असते. केंद्राभिमुख शक्ती ह्या राष्ट्रप्रेमाचे प्रतिक असुन फुटीरवादी शक्तींना आळा घालण्याचे कार्य करतात. सीमा प्रदेशात केंद्रत्यागी शक्ती एकवटलेल्या असण्याची शक्यता असते. केंद्रत्यागी शक्ती म्हणजे राष्ट्रप्रेम नसलेल्या राष्ट्रविरोधात कारवाया करणाच्या फुटीरवादी शक्ती होय.

(४) सीमांमध्ये परिवर्तन शक्यतो होत नाही. भौगोलिक घटकांमध्ये काही कारणामुळे बदल झाल्यास सीमामध्ये परिवर्तन होऊ शकते. भूकंप, नदीने पात्र बदलवणे, नदीप्रवाह ज्वालामुखी इत्यादींमुळे

त्याच्यात बदल संभवतो . सीमाप्रदेश परिवर्तनीय असु शकतात. सीमाप्रदेशातील लोकांच्या भाषा, संस्कृती, सामाजिक चालीरिती, राजकीय विचार, व्यवसाय इत्यादीत बदल होऊ शकतात..

५) सीमारेषेवर भुरूपे व मनुष्य वस्ती नसते. सीमाप्रदेशात विविध भुरूपे आणि मनुष्यवस्ती आढळते.

६) सीमारेषा या दोन भिन्न संस्कृतींना अलग करणाऱ्या रेषा असतात. सीमा प्रदेशात संयुक्त तत्व आढळून येते म्हणजेच व्यवसाय, भाषा, संस्कृती, पोषाख, अन्न इत्यादींबाबत संयुक्त तत्व आढळून येते.

७) सीमांना वैधानिक वलय असून त्या राजकीय घटना मानल्या जातात. सीमा प्रदेशांना वैधानिक वलय नसते. ते राजकीय घटना समजले जात नाहीत.

८) सीमांना आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार असतो तरीही सीमावाद सतत सुरू असतात त्यावरून दोन राष्ट्रांमध्ये बऱ्याचदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत असते. सीमा प्रदेशांना आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार नसतो सीमा प्रदेशामध्ये बेकायदेशिर घुसखोरी मुळे फुटीरवादी शक्ती कार्यरत असतात.

९) सीमारेषेत राजकीय तत्त्व असते. सीमाप्रदेशात भौगोलिक तत्त्व असते.

१०) बिगरमालकीचे प्रदेश (No Man's land) सीमा विभागात आढळतात. जेथे सीमा आखलेल्या नसतात तेथे ते आढळतात. सीमाप्रदेशात बिगरमालकीचे प्रदेश आढळत नाहीत

## विभाग दुसरा: राजकीय भूगोल मधील संकल्पना

**प्र. 1) खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१.खालीलपैकी कोणत्या ठिकाणी मानवी वसाहत आढळत नाहीत

अ) सीमा (frontiers) **ब) सरहद्द (Boundaries)** क) पठार ड) पर्वत

२.राज्य एक जैविक घटक आहे असे कोणी प्रतिपादन केले

अ) हम्बोल्ट ब) रिटर**क) रॅटझेल** ड) ब्लाश

३.निश्चित भूप्रदेशात राजकीय दृष्ट्या संघटित झालेले लोक म्हणजे काय

**अ) राज्य** ब) राष्ट्रक) लोकशाही ड) हुकूमशाही

४.खालीलपैकी राज्याच्या निर्मितीस कोणता मूलभूत घटक नाही

अ) निश्चित भूप्रदेश ब) शासनसंस्था क) लोकसंख्या **ड) भाषा**

५.एका विशिष्ट भूप्रदेशात असलेली संस्कृती, इतिहास, धर्म, वंश, भाषा इत्यादी सामायिक बंधनामुळे एकत्र आलेले लोक म्हणजे काय

**अ) राष्ट्र** ब) राज्य क) सीमारेषा ड) सीमा प्रदेश

६.खालीलपैकी कोणता राज्याच्या निर्मितीत महत्त्वाचा घटक आहे

**अ) सार्वभौमत्व** ब) राजकीयत्व क) वांशिकत्व ड) राष्ट्रीयत्व

७.खालीलपैकी राष्ट्र निर्मितीस कोणता घटक आवश्यक नाही

अ) वंश ब) धर्म क) भाषा **ड) भूप्रदेश**

८.राज्यास समुद्र किवा महासागराचे सान्निध्य लाभले असल्यास त्यास कोणते स्थान म्हणतात

**अ) सागरी** ब) लष्करी क) भूखंडीय ड) कृत्रिम

९.राष्ट्रीय सीमेनुसार काय बदलते

अ) परराष्ट्र धोरण ब) आर्थिक क्रियाकलाप क) संसाधन वापर **ड) वरीलपैकी सर्व**

१०.ग्रेट ब्रिटन या देशाचे स्थान कोणत्या प्रकारचे आहे

**अ) सागरी स्थान** ब) भूखंडीय स्थान क) गिरीपाद स्थान ड) यापैकी नाही

११.खालीलपैकी कोणत्या देशाचे स्थान भूखंडीय स्वरूपाचे आहे

**अ) मंगोलिया** ब) पाकिस्तान क) म्यानमार ड) पोर्तुगाल

१२.कोणत्या प्रदेशात लोकवस्ती आढळते

**अ) सीमा प्रदेश** ब) सीमा रेषा क) अ व ब या दोन्ही ठिकाणी ड) यापैकी नाही

१३.संयुक्त संस्थाने व मेक्सिको या देशांची सीमा कोणत्या घटकाने निश्चित केली आहे

अ)पर्वत ब)सरोवर **क) नदी** ड)वाळवंट

१४.झांबिया व झिंबाब्वे या दोन देशांची सीमा कोणत्या प्रकारची आहे
अ) पर्वतीय ब) नदी **क) वाळवंटी** ड) सरोवर

१५.भारत व म्यानमार या देशांची सीमा कोणत्या पर्वताने निश्चित केली आहे
**अ) आराकान योमा** ब) हाला सुलैमान क) नागा ड) मिझो

१६.कोणत्या देशाला अनेक देशांच्या सीमा लाभल्या आहेत
**अ) भारत** ब) ऑस्ट्रिया क) नेपाळ ड) हंगेरी

१७.वांशिक ऐक्य असलेला व एकाच भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करणारा लोकांचा समूह म्हणजे काय
अ) राज्य ब) देश क) समाज **ड) राष्ट्र**

१८.भारत व पाकिस्तान सीमा ही कोणत्या स्वरूपाची आहे
**अ) कृत्रिम** ब) नैसर्गिक क) अ व ब दोन्ही प्रकारची ड) वरीलपैकी नाही

१९.सीमांचे (सीमाप्रदेशाचे/frontiers) स्वरूप कसे असते
अ) राजकीय ब) सामाजिक **क) क्षेत्रिय** ड) रेषायुक्त

२०.सीमारेषांचे (Boundaries) स्वरूप कसे असते
अ) राजकीय ब) सामाजिक क) क्षेत्रिय **ड) रेषायुक्त**

२१.चिली व अर्जेंटिना या दोन देशातील सरहद्द ही कोणत्या पर्वताने निश्चित केली आहे
**अ) ॲंडिज** ब) रॉकीज क) आल्प्स ड) उरल

२२.संयुक्त संस्थाने व मेक्सिको या देशांच्या दरम्यान असलेली सरहद्द कोणत्या नदीने निश्चित केली आहे
अ) मिसीसीपी **ब) रिओ ग्रँड** क) कोलोंबीया ड) कोलोरॅडो

२३.प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा आधार न घेता जेव्हा भूमितीच्या आधारे सरहद्दी निश्चित केल्या जातात त्यांना कोणती सीमारेषा म्हणतात *
अ) सांकृतिक ब) भौतिक क) नैसर्गिक **ड) ज्यामितीय**

24. राष्ट्राच्या निर्मिती विषयी खालीलपैकी ______ यांनी मते मांडली.
**अ) बर्जेस व लिकाॅक** ब) वार्कर व गार्नर क) ॲरिस्टॉटल ड) देसर मुर्व्हर

25. राज्य या संज्ञेचा प्रयोग कोणत्या शास्त्रज्ञाने केला.
**अ) ॲरिस्टॉटल** ब) गार्नर क) मॅकव्हीले ड) बोडीन

26. कोणत्या देशाची बाह्यकृती एकसंघ आहे.
अ) ब्रिटन **ब) फ्रान्स** क) इंडोनेशिया ड) जपान

27. राज्याच्या अंतर्गत कारभारात सर्वश्रेष्ठ असणारी बाहेरील देशांच्या नियंत्रणापासून स्वतंत्र असणारी सत्ता म्हणजे काय.
अ) लोकशाही ब) हुकुमशाही **क) सार्वभौम** ड) वांशिक

28. भारत व म्यानमार यांची सीमा कोणत्या स्वरूपाची आहे.

अ) कृत्रिम **ब) नैसर्गिक** क) अ व ब दोन्ही प्रकारची ड) वरील पैकी नाही

29. अफगाणिस्तान पाकिस्तान सरहद्द कोणत्या पर्वताने निश्चित केली आहे.

अ) मिझो ब) गारोक) ॲराकॉन योमा **ड) हाला सुलैमान**

30. भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान कोणत्या वाळवंटी भूप्रदेश आहे.

अ) सौराष्ट्र **ब) कच्छ रण** क) सहारा ड) गोबी

31.भारत व चीन यांच्यामधील सीमा रेषेला काय म्हणतात

**अ) मॅकमोहन रेषा** ब) रेड क्लीप रेषा क) ड्यूरांड रेषा ड) यापैकी नाही

32.मॅकमोहन रेषा कोणत्या पर्वतातून गेली आहे

अ) आल्प्स **ब) हिमालय** क) रॉकीज ड) अँडीज

33.भारत चीन सीमेच्या एकूण लांबीपैकी सर्वात जास्त लांबी कोणत्या राज्याशी जोडली गेली आहे

**अ) जम्मू-काश्मीर** ब) हिमाचल प्रदेश क) उत्तरांचल ड) अरुणाचल प्रदेश

34.कोणत्या साली चीनने भारतावर आक्रमण केले

अ) १९५९ ब) १९६० क) १९६१ **ड) १९६२**

35.भारत व पाकिस्तान यांच्यामधील सीमा रेषेला नाव काय आहे

अ) मॅकमोहन रेषा **ब) रेड क्लीप रेषा** क) ड्यूरांड रेषा ड) यापैकी नाही

36.कोणत्या आयोगाने भारत-पाकिस्तान सीमा निश्चित केली आहे

अ) सायमन ब) मॅकमोहन **क) रॅडक्लिफ** ड) वरीलपैकी नाही

37.भारत-पाकिस्तान सीमारेषेची लांबी किती आहे

अ) 3000 किलोमीटर ब) 3120 किलोमीटर क) 3223 किलोमीटर **ड) 3323 किलोमीटर**

38.भारत पाकिस्तान सीमा रेषा कोणी निर्धारित केली

अ) लॉर्ड माउंटबेटन **ब) सर सिरिल रेडक्लिफ** क) क्लेमेंट एटली ड) वरीलपैकी नाही

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी दिलेल्या Question Bank मधील प्रश्न

1. खालीलपैकी कोणता राष्ट्र निर्मितीस आवश्यक घटक नाही?

   अ) धर्म ब भाषा (वंश क (**ड व्यापार (**

2. 'जपान' या देशाचे स्थान कोणत्या प्रकारचे आहे?

   अ) भूखंडीय स्थान **बसागरी स्थान (** क परस्पर सानिध्याचे स्थान (ड यापैकी नाही (

3. चीन व भारत या देशांमधील सीमा कोणत्या पर्वताने निश्चित झाली आहे?

अ) सह्याद्री **ब हिमालय (**क विंध्य (अरवली ड (

4. सीमारेषांचे स्वरूप कसे असते?

अ) बाहेरील भाग **बरेषायुक्त (** क यापैकी नाही (क्षेत्रीय ड (

5. कॅनडा व संयुक्त संस्थांच्या दरम्यानची सिमारेषा कोणत्या प्रकारची आहे?

अ) अध्यारोपीत ब अवशिष्ठ (स्वभावोद्भुत क **(ड पूर्वऐतिहासिक (**

6. कोणत्या सीमारेषा अक्षवृत्त व रेखावृत्त यांना सामान्यपणे समांतर असतात?

अ) सांस्कृतिक सीमारेषा बपर् (वतीय सीमारेषा **क ज्यामितीय सीमारेषा (**डसरोवर सीमारेषा (

7. राज्याच्या निर्मितीत खालीलपैकी कोणता घटक आवश्यक नाही?

अ) लोकसंख्या ब भूप्रदेश **(कधर्म (** ड शासन संस्था (

**प्र. 2) टिपा लिहा.**

१) राष्ट्राची संकल्पना

२) राष्ट्राच्या निर्मितीस आवश्यक घटक

३) राज्याची संकल्पना

४) राज्याचे घटक

५) सीमांचे प्रकार

६) सरहद्दीचे महत्व

७) सरहद्दींचे उत्पत्तीनुसार वर्गीकरण

८) सीमा व सीमारेषा मधील फरक

**प्रश्न प्र. 3) सविस्तर उत्तरे लिहा.**

१) राष्ट्र म्हणजे काय? राष्ट्राच्या निर्मितीस आवश्यक घटक स्पष्ट करा

२) राज्य म्हणजे काय? राज्य निर्मितीवर परिणाम करणारे भौगोलिक घटक स्पष्ट करा

३) सरहद्द म्हणजे काय? सरहद्दींचे वर्गीकरण स्पष्ट करा.

४) सीमा म्हणजे काय? सीमांचे प्रकार स्पष्ट करा.

**संदर्भ ग्रंथ/ Reference book**


1. एभूगोलाची मुलतत्वे :कोळेकर .एस .सवदी व पी .बी ., निराली प्रकाशन, पुणे
2. प्रा.एस. व्ही. ढाके व डॉ. व्ही. जे. पाटील: राजकीय भूगोल, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3. प्रा. के. ए. खतीब: राजकीय भूगोल, मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर
4. भागवत अ.वि. : राजकीय भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे
5. डॉ. घारपुरे विठ्ठल: राजकीय भूगोल, पिंपळापुरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
6. डॉ. मगर, जयकुमार: राजकीय भूगोल, विद्या प्रकाशन, नागपूर